# निसर्गप्रेमी, ट्रेकर्ससाठी पर्वणी

● मुंबई टाइम्स टीम

डोंगरदऱ्यांमध्ये आपले विविध छंद जोपासत भटकंती करणारे ट्रेकर्स आणि निसर्गप्रेमींना या आठवड्यात ऑडिओ-व्हिज्युअल व्याख्यानमाला आणि फिल्म फेस्टिवलच्या रुपाने विशेष पर्वणी मिळणार आहे. चक्रम हायकर्स या संस्थेतर्फे रौप्यमहोत्सवानिमित्त येत्या बुधवार ३ ऑक्टोबरपासून रविवार ७ ऑक्टोबरपर्यंत दररोज रात्री आठ वाजता मुलुंड (पूर्व) येथील सुयोग सभागृहात विविध क्षेत्रातील तज्ज्ञांची व्याख्यानमाला होणार आहे, तर शैलभ्रमर संस्थेतर्फे रविवारी ७ ऑक्टोबर रोजी दुपारी तीन वाजता छत्रपती शिवाजी टर्मिनसजवळच्या चर्चगेटला सिडनहॅम कॉलेजशेजारच्या विद्यार्थी भवनातील शाहिर अमरशेख सभागृहात माऊन्टेनिअरिंग फिल्म फेस्टिवल होत आहे.

चक्रम हायकर्सच्या व्याख्यानमालेत बुधवारी 'खगोलीय शिवकाल' (प्रा. मोहन आपटे), गुरुवारी 'महाराष्ट्रातील लेणी' (डॉ. दाऊद दळवी), शुक्रवारी 'हिमालयातील गिरीशिखरे' (प्रा. रमेश देसाई), शनिवारी 'शिवरायांची दुर्गनीती' (प्रा. प्र. के. घाणेकर) आणि रविवारी 'आपले पक्षी' (डॉ. श्रीरंग बखले) या विषयांवर मान्यवरांची व्याख्याने आहेत.

शैलभ्रमरच्या फिल्म फेस्टिवलमध्ये 'सह्याद्रीतील बौध्द लेणी' (शेखर राजेशिर्के, वैशाली हळदवणेकर), 'चेंग कुमदान मोहीम' (हिमालयन क्लब) 'उत्तुंग स्वप्न' (शैलभ्रमर), 'पनवेल ते पाकिस्तान सायकल मोहीम' (निसर्गमित्र), 'लिंगाणा सुळका चढाई', 'गंगाजल' या फिल्म्स आहेत.

mumbaitimes@indiatimes.com